# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनाट क्रमांक ३१४-२२** **दिनांक १७/१०/२०२२**

## घरामध्ये चोरी करणाऱ्या नोकरास अटक करुन ७,०८,५००/- रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.

दिनांक १५/०९/२०२२ रोजी ते दि. ०८/१०/२०२२ रोजी दरम्यान पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत अष्टविनायक इंडस्ट्रिज जवळ, वसई फाटा, वसई (पु.), ता. वसई येथील फिर्यादी यांचेकडे नोकरी करणाऱ्या आरोपीत नामे. संदीप यादव, रा. वसई फाटा, वसई (पु.) याने फिर्यादी यांचे घरात ठेवलेले एकुण- ७,५०,०००/- रुपये रोख रक्कम चोरुन नेलेबाबत फिर्यादी- श्री. प्रल्हाद रामदुल्हारे यादव, वय-७६ वर्षे, रा. अष्टविनायक इंडस्ट्रिज जवळ, वसई फाटा, वसई(पु.), ता. वसई यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ८५८/२०२२, भा.दं.वि.सं. कलम-३८१ प्रमाणे दिनांक १०/१०/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद दाखल गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे संशईत हा उत्तरप्रदेश येथे पळुन जाण्याच्या तयारीत असतांना त्यास सापळा रचुन नमुद आरोपीत नामे १) संदीप यादव, रा. सिध्दार्थनगर, राज्य-उत्तरप्रदेश यास ताब्यात घेवुन त्यास नमुद गुन्हयात दिनांक ११/१०/२०२२ रोजी अटक केली आहे. नमुद आरोपीताचे चौकशी दरम्यान त्याचेकडून एकुण- ७,०८,५००/- रोख रक्कम हस्तगत करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. अमर मराठे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

---ooo---